# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

## दिनांक ०७-०३-२०१८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

दिनांक ०७ मार्च २०१८ रोजी (का.प.क्र.०८) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.४० वा.वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.डी.एम.मुगळीकर, भाप्रसे, नगर सचिव श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ३. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ४. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ५. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ६. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ७. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ८. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ९. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| १०. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| ११. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| १२. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १३. | स.स. श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले |
| १४. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १५. | स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| १६. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १७. | स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद |
| १८. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| १९. | स.स. श्री.सय्यद मतीन रशीद |
| २०. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| २१. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २२. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| २३. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |
| २४. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| २५. | स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| २६. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| २७. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| २८. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |

| | |
|---|---|
| २९. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ३०. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| ३१. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| ३२. | स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया |
| ३३. | स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज |
| ३४. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ३५. | स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ |
| ३६. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ३७. | स.स. श्री.एडके विकास प्रकाश |
| ३८. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| ३९. | स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास |
| ४०. | स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण |
| ४१. | स.स. श्री.शेख जफर अखतर |
| ४२. | स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ४३. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ४४. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ४५. | स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत |
| ४६. | स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश |
| ४७. | स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| ४८. | स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी |
| ४९. | स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण |
| ५०. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ५१. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ५२. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ५३. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |
| ५४. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ५५. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ५६. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ५७. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ५८. | स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल |
| ५९. | स.स. श्री.सोहेल शकील शेख |
| ६०. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ६१. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ६२. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ६३. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ६४. | स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे |
| ६५. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |

| | |
|---|---|
| ६६. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ६७. | स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट |
| ६८. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ६९. | स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे |
| ७०. | स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे |
| ७१. | स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |
| ७२. | स.स. कु.जमादार सायली भागवत |

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम

(या वेळी सभागृहात माजी स.सदस्या श्रीमती लिलावती घायतिलक, कार्य.अभियंता श्री.कोल्हे यांचे वडील श्री.आनंदा कोल्हे, प्रसिध्द अभिनेत्री श्रीदेवी यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

**विषय क्रमांक ३६०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दि.१६.०२.२०१८ पासून कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरीता पर्यायी जागेवर कचरा टाकण्यास नागरीकांकडून तीव्र विरोध झाल्यामुळे निर्माण झालेल्या आणीबाणीच्या समस्येवर विचार विनिमय करून धोरण निश्चित करणे बाबत.

मा.महापौर :शहरात २० दिवसापासून कचऱ्याची मोठी समस्या निर्माण झाली. नागरीक, स.सदस्य यांनी यातून मार्ग काढणेसाठी प्रयत्न झाले. मा.न्यायालयात एक रिट पिटीशन होते. त्यातून काही दिलासा मिळेल असे वाटले. परंतु काही संकेत मिळाले नाही. आज रोजी आणीबाणीची परीस्थिती निर्माण झाली. पर्याय शोधतो आहे. स.सदस्यांच्या मार्गदर्शक, सुचना कराव्यात काही ठिकाणी परीस्थीती बदलली नाही. नियोजन करत असतांना मार्ग काढावा लागेल. नागरीकांचा विश्वास संपादन करून उपाययोजना केलेल्या आहे. कचरा जिरवणे, वर्गीकरण करणे, प्लॅस्टीक बंदी, ग्रीनवेज कमी करणे यासाठी प्रयत्न केले. कॅम्प घेणे नागरीकामध्ये जनजागृती साठी प्रयत्न चालू आहे. सर्व सदस्य व नागरीक यांना विश्वासात घेऊन कचरा कोंडी सोडवायची आहे. डीपीआरचा विषय आहे. यासाठी राज्य व केंद्र शासन निधी देणार आहे. कायम स्वरूपी तोडगा काढायचा आहे. जागा शोधणे चालू आहे परंतु प्रत्येक ठिकाणी विरोध होत आहे. इक्रो इन्व्हारमेंन्टल सर्वीसेस एजन्सीला डीपीआर तयार केला ते प्रोजेक्ट सादर करणार आहे त्यानुसार निर्णय घ्यायचा आहे.

श्री.राजू शिंदे :प्रशासनाने काय तयारी केली? भुमिका स्पष्ट करावी.

मा.आयुक्त :नारेगाव-मांडकी येथे शहरातील कचरा १९८५ पासून टाकत होतो. तेथील ग्रामस्थानी आता विरोध केला. ११५ वार्ड व झोन ९ आहे. या जागेचा ताबा २२.०५.१९८५ ला मिळाला होता. ७५ वार्ड मध्ये कचरा वेगवेगळा होत होता तो एकत्रित करून नारेगाव येथे टाकला जात होता. झोन ४, ६ एन-३,४, एन-१ भागात आपण पीट कम्पोस्टींगचे प्रयोग यशस्वी रित्या राबविले. ॲट सोर्स

सेग्रीकेशन बऱ्याच वार्ड मध्ये करतो आहे. नारेगाव कचरा वर प्रोसेस करणेसाठी निविदा मागविल्या होत्या. सत्यम बायोफर्टीलायजर यांना भाडेपट्टेवर जागा दिली होती त्यावर प्रोसेसींग सुरू केले होते त्यानंतर २२.०६.२००३ रोजी या एजन्सीने करारातील अटी शर्तीचे पालन केले नाही. ज्या वेगाने कचरा प्रोसेसींग करायला पाहिजे तसे केले नाही म्हणून त्यास बंद केले. ठेका रद्द केला. सन-२००३ पासून २०१८ पर्यत कचरा तेथे डम्प करीत होतो. दिनांक १६.१०.२०१७ रोजी नारेगाव मांडकी कृती समितीने कचरा टाकण्यास विरोध केला व त्यावेळी मा.विधान सभा अध्यक्ष मा.श्री.बागडे साहेब यांनी मध्यस्ती केली व चार महिन्यात तोडगा काढू. असे आश्वासन दिले. त्यामूळे तेथील नागरीकांनी तेंव्हा उपोषण मागे घेतले होते. पुन्हा दि.१६.०२.२०१८ पासून तेथे कचरा टाकण्यास विरोध झाला. त्या उपोषण कर्त्याची आम्ही भेट घेतली. तेथे कचरा टाकण्यासाठी प्रयत्न केले. परंतु विरोध होतच राहिला.भविष्यात काय नियोजन असणार आहे. असे त्या लोकांचे म्हणणे होते. माहिती त्यांना दिली. दिनांक १०.१०.२०१७ रोजी मा.विभागीय आयुक्त यांना सॅनेटरी लॅण्ड फिल्ड साईटसाठी शहरालगत ४० हेक्टर जागा मिळावी म्हणून पत्र दिले. जागा मिळाली नाही. मा.जिल्हाधिकारी यांना दि.१६.१०.२०१७ रोजी पत्र देऊन पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी विनंती केली, खदानीची जागा द्यावी. तोंडी बोलणे झाले जागा मिळाली नाही. ऑक्टोबर २०१७ मध्ये चीन मधील काही कंपनीचे लोक या शहरात आले होते. त्यांनी नारेगाव डेपोची पाहणी केली. ५० मॅट्रीक टन कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा डीपीआर त्यांनी तयार केला. तो शासनाकडे सादर केला होता व त्यात असे म्हटले होते की, या डीपीआरला मान्यता दिली तर कचऱ्याची विल्हेवाट लावता येईल. त्यास मान्यता आली नाही. महापालिकेचे स.उपमहापौर व इतर पदाधिकारी यांनी चीन येथे भेट दिली होती. तेथील पध्दत योग्य आहे असे म्हटले होते. त्याप्रमाणे श्री.डी.पी.कुलकर्णी यांनी डीपीआर तयार केला व शासनास पाठविला होता. त्यावर कार्यवाही केलेली नव्हती. शासनाने नारेगाव येथील व शहरातील कचराची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट “स्वच्छ भारत मिशन” अंतर्गत कशी लावायची? यासाठी प्रकल्प सल्लागार समितीची इंदौरची एजन्सीची नियुक्ती दि.०५.०१.२०१८ रोजी शासनाने केली आहे. या एजन्सीला डीपीआर तयार करण्यासाठी दि.२४.०१.१८ रोजी पत्र दिले. त्यानुसार त्यांनी डीपीआर तयार करून सादर केला. तो शासनास पाठविला होता. त्यात रिव्हीजन करून पुन्हा डीपीआर करून पाठविला. नारेगाव येथील व शहरातील कचरा डिस्पोजल करणे. या दोन्हीचा डीपीआर रु.७७ कोटीचा शासनास दिला आहे. यानंतर काही खाजगी जागा शोधून त्यासाठी जाहीर प्रगटन देऊन इक्स्प्रेशन ऑफ इन्ट्रेस किंवा अभिव्यक्ती स्वारस्य ५ फेब्रुवारी मागितले होते. त्यामध्ये ग्रीन इंडिया यांची निविदा कमी दराची असल्यामूळे तो प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवून मान्यता घेतली. त्यानुसार बाभूळगांव येथे कचरा डम्प करण्यास सुरू केला. शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणार होतो. परंतु तेथेही ग्रामस्थांचा विरोध झाला. त्यानंतर पर्यायी व्यवस्था म्हणून मिटमिटा येथे शासकीय जमिनिवर दि.०७.०२.२०१८ रोजीपासून

कचरा टाकण्यास सुरूवात केली. तेथेही विरोध केला. याच निविदेतील एका एजन्सीची जमिन वाळूज परीसरात होती. तेथे कचरा टाकण्यास सुरूवात केली. त्यांचे बाजूला असलेले गाव यांनी विरोध केला. पहाडसिंगपूरा येथे श्रीमती शितल डहाळे, शेतकरी त्यांनी त्यांचे जागेवर कचरा टाकण्यास परवानगी दिली. तेथेही विरोध झाला. त्यानंतर गांधेली शिवारात जागेचा शोध घेतला. संमती दिली. कचरा टाकणेस गेलो असता ग्रामस्थांनी विरोध केला. शहरातील मनपाच्या जागांचा शोध घेतला असता पडेगाव कत्तलखाना येथे १८ एकर जागा तेथेही विरोध केला. सफारी पार्कवर जागेवर विरोध झाला. शहांगज भाजी मंडई मध्ये ५ हजार चौ.मी जागा भाजी मंडईसाठी राखीव आहे. बाजूला एसटी बसस्टेशनची जागा आहे. तेथे तात्पुरता कचरा टाकत आहोत. सेन्ट्रल नाका येथे मनपाची ७ एकर जागा आहे. परंतु तेथे बाजूलाच वर्कशॉप व गोडाऊन आहे. तात्पुरता कचरा तेथे ठेवला आहे. हिमायत बाग येथे ९ एकर जागा उद्यानासाठी आरक्षीत आहे. तेथे कचरा टाकण्यास बाजूच्या नागरीकांनी विरोध केला. जांभूळवन येथे ४ एकर जागा असून तेथे अतिक्रमण आहे ते हटविणेची कार्यवाही होत आहे. त्यांचे बाजूला १ एकर जागा असून तेथे खड्डे घेत आहे. दररोज ४-४ ट्रक कचरा टाकतो. त्यासाठी उपमहापौर हे मदत करीत आहे. चिकलठाणा येथे सार्वजनिक वापरासाठी १७ एकर जागा आरक्षीत असून तेथे कचरा टाकण्यास गेलो असता बाजूच्या परीसरातील नागरीकांनी विरोध केला. बाजूला एअरपोर्ट असल्याने ती जागा योग्य वाटत नाही. संघर्षनगर भागात ४ एकर जागा आहे ती स्पोर्ट साठी राखीव असून तेथे प्रयत्न केला असता कचरा टाकण्यास विरोध झाला. विठ्ठलनगर भागात दीड एकर जागा असून तेथे पीट कम्पोस्टीग घेऊन सुरू केले. संतसृष्टीमध्ये एक एकर जागा असून तेथे खड्डे घेऊन कचरा टाकण्याचे काम सुरू केले. कांचनवाडी येथे ४० एकर जागा असून ती जलनि:स्सारण व्यवस्थेसाठी राखीव असून तेथे पोलीस सुरक्षा घेऊन ४० गाड्या टाकल्या होत्या. परंतु तेथील नागरीक रस्त्यावर येऊन बसले. तेथेही विरोध झाला. त्यानंतर छावणी बोर्डाशी करारपत्र केले होते. तात्पुरती परवानगी दिली होती. संमती दिल्यानंतर १५-२० गाड्या टाकल्या बाजूच्या गावांनी कचरा टाकण्यास विरोध केला. मिटमिटा गट नं.५४ मध्ये खाजगी जागा मालकाची सम्मती घेतली आहे. तेथे कचरा टाकण्यास विरोध केला. जाभंळागावाच्या शेतकऱ्यांनी संमती दिली. आठ ट्रक कचरा टाकला. पुन्हा ते लोक एकत्र झाले विरोध केला. अनेक ठिकाणी प्रयत्न केले. पिराचीवाडी, कच्ची घाटी गावाचा एक प्रस्तास समोर आला होता की त्या गावाचे पुर्नवसन केले तर तेथील १००-१५० एकर जागा देण्यास तयार आहे. तसे प्रयत्न चालू आहे. जागा मिळविण्यासाठी प्रयत्न चालू आहे.जेथे जागा सलेक्ट केली तेथे नागरीकांचा विरोध होतो आहे आज रोजी शहरात पडून असलेला व वाहनामधे असलेला कचरा अडीच ते तीन हजार मेट्रिक टन आहे. यामूळे माशा व इतर रोगराई होऊ नये म्हणून पावडर मारतो आहे. पुणे येथील एका कंपनीने चांगल्या दर्जाची औषधी देण्याचा प्रस्ताव दिला. त्यास मान्यता दिली. त्या औषधीचा कचऱ्यावर फवारतो आहे. यानंतर मा.उच्च न्यायालयात श्री.कुलकर्णी नावाचे

व्यक्तीने एक याचिका दाखल केली की, साचलेला कचऱ्याचे ताबडतोब डिस्पोजल करावे. अशी विनंती याचिकेत केली. वेळोवेळी सुनावणी झाली. सुनावणी अंती काल नारेगाव येथील नागरीकांनी दुसरी एक याचिका दाखल केली होती. त्यामध्ये मा.न्यायालयाने मनपास या याचिकेचा निकाल लागेपर्यत नारेगाव येथील कचरा डम्पींग करण्यास प्रतिबंध केला. मनाई हूकूम पारीत केला. अंतिम निकाल दोन-तीन दिवसात निकाल हाती येईल. दुसरीकडे जेथे जागा बघायला जातो. तेथे लोक विरोध करीत आहे. अशा परीस्थितीत दोन पर्याय आहे. एक पर्याय विकेद्रीत पध्दतीने जो कचरा निर्माण होतो. तो झोन वाईज विकेंद्रीत पध्दतीने करणे. विकेंद्रीत पध्दत दोन एक पीट कॉम्पोस्टीक व मॅकनीकल कॉम्पोस्टीग, जेथे मनपाच्या जागा आहेत. तेथे पीट कॉम्पोस्टींग हे ओल्या कचऱ्यावर करू शकतो. काही ठिकाणी सुरू केले. या बरोबरच मॅकनिकल कॉम्पोस्टीग सुध्दा करावे लागेल. त्यासाठी कंपनीच्या मशीन्सची चाचणी केली. ३-४ एजन्सीज ॲप्रोज झाले आहे. एक्सेल कंपनीने डेमोटेशन दिले होते. मुंबई येथे जाऊन पाहणी केली. वेगवेगळे क्षमतेचे मशीन आहे. त्यात कचरा टाकल्यानंतर १०-१५ मिनिटात मिश्रण होऊन खत बाहेर पडते. ०२ डीपीडी क्षमतेचे मशीन ८५ लक्ष मध्ये येते. या प्रमाणे ५-१० टीपीडी मशीन वेगळ्या प्रकारचे आहे. त्यानंतर अमरावतीने श्री.प्रशांत चेडके यांना स्वच्छता दुत केलेले होते. त्यानी मशीनचा प्रस्ताव दिला आहे. त्यांचेकडे २५ टीपीडी मशीन आहे. रु.८५ लक्ष किंमत आहे. साधारण ९ मशिन घेतल्या. तर रु.८-५० कोटी खर्च आहे.

प्लास्टीक वेगळे करावे लागेल. त्या मशीन रु.४२ लक्ष मध्ये आहे. दोन्ही मशीन खरेदी केल्यास साधारण रु.१४ कोटी खर्च लागणार आहे. मालेगाव येथे एक पथक भेट देऊन आले. तेथे सेन्ट्रलाईज पध्दतीने कचरा प्रोसेस केली जाते. तेथे ओला-सुका कचरा एका प्लॅटफॉर्म वर आणला जातो. विन्ड्रोज तयार केले जाते. त्यावर स्प्रे मारला जातो. २१ दिवस तसेच ठेवून त्या मशीनमध्ये प्रक्रिया केली जाते. त्यातून ओला व सुका व प्लॉटीक कचरा वेगळा होतो. ओला कचरा पासून खत तयार होते. श्री.कोठारी येथे येऊन गेले. त्यांनी माहिती दिली. या मशीन २०० ते २५० मॅ.टन चे मशीन आहे. याची किंमत रु.६-७ कोटी पर्यत आहे. हे मशीन पाहिल्यानंतर परवा एक कोरियन कंपनी आली. खगा एजन्सी त्या कंपनीचे नाव असून या एजन्सीने काल एक प्रस्ताव दिला. वेस्ट टू एनर्जी मिस्क वेस्ट हा इन्सेरेशन पध्दतीने भट्टीमध्ये टाकायचा ॲश तयार होते. त्यापासून विटा तयार करता येतात. विद्युत निर्मीती होते. त्या कंपनीचे म्हणणे असे की, ५ एकर जागा २५ वर्षासाठी द्यावी. पाण्याची डिमांड आहे. प्रोसेस प्लॅन्ट कचरा आणून द्यावा असे त्यांचे म्हणणे आहे. इलेक्ट्रीक पॉईन्ट द्यावा लागेल. बाकी खर्च मनपास लागणार नाही. निर्माण होणारी विद्युत मधील ५ टक्के वाटा संपूर्ण ॲश आपल्या मालकीची राहिल. या एजन्सीने शासनाची भेट घेतली. त्याचा राजकोट व जबलपूर शहरात प्रकल्प चालू आहे. वेस्ट टू एनर्जीचा प्रकल्प करू शकतो. १२-१४ महिने कालावधी लागेल. हे ऑप्शन सध्या उपलब्ध आहे. दुसरे असे की, कचऱ्यापासून बायोगॅस तयार करू शकतो.

त्यासाठी बऱ्याच एजन्सीज समोर आल्या आहेत. प्रस्ताव दिला आहे. त्यांचे असे म्हणणे की, एन-५ सिडको मध्ये ५ हजार स्क्वे.मीटर जागा आणि एक एचपी लाईट उपलब्ध करून दिली तर सिडको भागातील किमान १० हजार किलो क्षमतेचा प्रकल्प उभारतील. त्यावर शेणखत प्रक्रिया करून जैवीक खत व गॅस तयार होईल. ते त्यांचे मालकीचा राहिल. प्रकल्पाचा पुर्ण खर्च ते करणार आहे. प्रकल्पाची देखरेख व स्वच्छता ठेवण्यासाठी १० कर्मचारी लागतील. एकाच वेळी ५-६ प्रभागामध्ये प्रकल्प करण्याची तयारी दर्शविली आहे. प्रस्ताव आला आहे छाननी करून घेऊन तो मा.महापौराकडे सादर करतो. श्री.कुलकर्णी नावाचे उद्योजक आले होते. त्यांचेकडे अडीच व साडेसात तसेच दहा हॉर्स पावर क्षमतेचे मशीन आहे. त्याची किंमत रु.८० हजार, रु.५ लक्ष, रु.१० लक्ष आहे. ऑर्डर दिली तर एका महिन्यात येईल असे म्हटले. दररोजचा जमा होणारा कचरा व डम्प केलेला कचरा त्याचे काय करायचे? असे प्रश्न आहे. ज्या सोसायटया, फ्लॅट सिस्टम असेल तेथे व हॉटेल, मंगल कार्यालय, किचन वेस्ट निर्माण करणारे यांनी स्वत:चा कचरा त्यांनी त्या भागात जिरवायला पाहिजे. त्यांना मनपा प्रशिक्षण देईल. मंगळवार, शुक्रवार फक्त सुका-कचरा जमा करणार आहे. ओला दररोज गोळा केला जाईल. ओला-सुका कचरा ज्या वार्डात जमा होतो. अशा वार्डात जागा बघुन तेथे २,५,१० टीपीडी क्षमतेचे मशीन बसून कार्यवाही केली जाईल. कोणत्या मशीनरी आहेत किंमत किती? योग्य कोणत्या आहेत? याची माहिती घेऊन योग्य असेल ते करावे लागेल. यासाठी किमान टेंडर कालावधी ठेवून मशीन घेऊ शकतो. जेथे कचरा सेग्रीकेशन होत नाही. त्यासाठी नागरीकांना प्रवृत्त करणे जागा असेल तर पीट कॅम्पोस्टींग करणे. हा पर्याय आहे. डीपीआर नुसार शहरात ६११ मेट्रिक टन कचरा जमा होतो. त्यामध्ये १० टक्के कचरा सेन्ट्रलाईज पध्दतीने प्रोसेस करावे. असे म्हटले आहे. यावर सर्व पदाधिकारी प्रशासन व विभागीय आयुक्त यांनी चर्चा केली असता, २५ टक्के सेन्ट्रलाईज व ७५ टक्के डि-सेन्ट्रलाईज पध्दतीने कम्पोस्टीक करू. त्याप्रमाणे डीपीआर मध्ये सुधारणा करून शासनाकडे पाठवावा लागेल. लगेच मान्यता मिळेल. एकूण डीपीआर ९६ कोटीचा आहे. त्यापैकी ३५ टक्के रक्कम केंद्र व २३.५० कोटी राज्य शासन व उर्वरीत तरतूद मनपास करावी लागेल. राज्य शासनाने मा.उच्च न्यायालयात असे नमूद केले की, तांत्रिक मान्यता जो डीपीआर आहे. तो एमजीपीकडे सादर केला. त्यास मान्यता १-२ दिवसात येईल. सर्व मान्यता २१ मार्च पर्यत पुर्ण केल्या जातील. केंद्र व राज्य शासनाचा वाट्यातील रु.२२ कोटी मार्च अखेर येतील. केंद्र शासनाकडे डीपीआर ताबडतोब मंजूर होईल. त्याचा जो काही हिस्सा आहे. तो लगेच देणार आहे. ही सर्व कार्यवाही चालू आहे. राज्य व केंद्र शासनाच्या निधीची उपब्धता होईल. कचरा विल्हेवाट लावण्यासाठी स्मार्ट सिटीच्या माध्यमातूनही प्रयत्न चालू आहे. स्मार्ट सिटीमधून तात्काळ पाच मशीन्स घेण्याची तरतूद केली आहे. यासाठी जवळपास रु.१० कोटी लागतील यास मंजूरी मिळाली आहे. स्मार्ट सिटी मध्ये असे नमूद केले होते की, मनपाचा डीपीआर वापरतो. तांत्रिक मान्यता मिळाल्यानंतर पाच मशीन्स् खरेदी करता

येऊ शकेल. ही सर्व कार्यवाही कमीत कमी वेळात करण्याचा प्रयत्न चालू आहे. किमान कमी कालावधीत टेंडर काढून कार्यवाही कशी करता येईल? तसे प्रयत्न करू. ते वार्डात बसवून कचरा विघटन करण्याचे काम होईल. केंद्रीय पध्दतीने कचरा प्रोसेसींग करायचा त्यासाठी मालेगाव येथील मॉडल येथील जी पध्दत योग्य वाटते. त्या मशीन्सची किमंत जास्त नाही. तेथे आज रोजी ३०० मेट्रीक टन कचरा प्रोसेसींग होतो. ही पध्दत अवलंबविली तर २०-२२ दिवसात कार्यवाही करता येईल. कोठारीकडे सध्या मशीन तयार आहे. वर्क ऑर्डर दिली. त्या मशीन्स् व सिव्हील वर्क त्यांची तयारी आहे. इतर ही काही लोक या क्षेत्रात काम करतात. ज्यांचे मशीन्स सलेक्ट होईल ते सेन्ट्रल प्रोसेसींग युनीट सुरू करू शकतो. ते कुठे सुरू करायचे त्यासाठी मनपाच्या ज्या जागा आताच वाचन केल्या. तेथे एका जागेची निवड करावी. शहरातील जमा झालेला कचरा कुठे नेऊन टाकायचा? हा प्रश्न आहे यासाठी मा.विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली नियंत्रण समिती स्थापन झाली. त्यांनी जागा सुचवल्या आहे. तेथे कचरा शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न सुरू आहे. कृती आराखडा तयार आहे. मा.विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांचे संमतीने कचऱ्याची विल्हेवाट लावणार आहे. आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ नये? यासाठी सर्व आरोग्यकेंद्रांना आवश्यक पुरेशी औषधी ठेवावी. अशा सुचना दिल्या आहेत. सर्व कर्मचारी यासाठी कामात आहेत. कचऱ्यामूळे कोणताही वाईट प्रसंग उद्‌भवलेला नाही. सर्व नागरीक व स.पदाधिकारी यांनी सहकार्य केले. यापूढे डम्पींगसाठी जागा मिळणे व डम्पींग करणे हे शक्य दिसत नाही. सर्व वार्डामध्येच कचरा जिरवावा लागेल. कचरा विघटीत करून त्यावर प्रक्रिया करून त्यावर कम्पोस्टींग करावे लागेल व मनपाच्या एका जागेवर सेन्ट्रल प्रोसेसींग प्लॅट करावा लागेल.

श्री.रेणुकादास वैद्य :सर्वांनी हा प्रश्न सोडविण्यास प्रयत्न केला. ही सर्व प्रोसेस होण्यास १ महिना लागणार आहे. दररोज काय प्रयत्न केले जातात. हे मिडीया पर्यंत गेले पाहिजे. ते गेले असते तर एवढा विरोध झाला नसता. ज्या बैठका घेतल्या. अनेक मते पुढे आली. डीपीआर तयार होतो. विविध पक्षाचे लोक होते अनेक मत बाहेर आली. ते सर्व डीपीआर मध्ये अंतर्भाव व्हावा. अनेक भागात कचरा पडून आहे त्यावर फवारणी होते. तो कुजला असेल तर मोफत घेऊन जाण्याचे आवाहन करावे. कचरा प्रश्न लॉंगलाईफ सोडवायचा असेल तर विकेंद्रीत पध्दतीने न होता सेन्ट्रलाइज पध्दतीने करावे. जेणे करून त्याची साफ-सफाई ठेवणे सहज शक्य होईल. विकेंद्रीत पध्दत केल्यास ९ ठिकाणी सर्व नागरीकांना समजावून सांगावे लागणार. परत नारेगाव होऊ नये यासाठी मॅकेनिकल कम्पोस्टींग पध्दत अवलंबवावी. नागरीकांना त्रास होणार नाही. मशीनरी घेत असतांना हायर साईट कॅपॅशिटीच्या मशीन्स घ्याव्यात. कमी कॅपीशिटीच्या मशीन्स घेऊ नये भविष्यात कचरा वाढणार आहे. १०-१५ वर्षाचे नियोजन लक्षात घेता हे करावे. देशात कुठेही वेस्ट टू एनर्जी हा प्रोजेक्ट सक्सेस नाही कारण त्यात एनर्जी जनरेट होण्यासाठी जो कचरा पाहिजे तो उपलब्ध असायला पाहिजे. त्यामूळे वेस्ट-टू-एनर्जीचा विचार होऊ नये. महापालिकेने कठोर होण्याची गरज आहे.

कारण अनेक नागरीक कुठे ही कचरा टाकतात, यावर नियंत्रण असावे कठोर कार्यवाही केली पाहिजे. ५ मशीनरी घेण्याची स्मार्ट सिटीच्या माध्यमातून परवानगी मिळाली आहे. टेंडर प्रक्रियेत वेळ न घालवता आयुक्तांनी त्यांचे अधिकारात कार्यवाही करावी. तसे आवश्यक वाटल्यास प्रस्ताव हे सभागृह मंजूर करून देईल. शहरातील नागरीकांनी शहर कचरा मुक्त करावे. कामाची गती वाढवावी.

श्री.प्रमोद राठोड :कचऱ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी सर्व प्रयत्न करीत आहेत. प्रशासनाने त्यांची भुमिका मांडली. हे सर्व पेपरवर घेऊन त्याची प्रसिध्दी करावी. जी जी कार्यवाही होते त्यांची माहिती जनतेपर्यत जावी. त्याची प्रत सदस्यांना द्यावी. कम्पोस्टींग करणेसाठी सेन्ट्रलाईज पध्दतीने करणेसाठी ६ महिने वर्ष लागू शकते. डिसेन्ट्रलाईज पध्दतीने करण्यातही ४-६ महिने लागू शकतात. काही वार्डात पीट कम्पोस्टींग करत आहोत. परंतु खड्डे किती दिवस करणार आहे? त्यासाठी जर प्रत्येक वार्डात मागणी नुसार मशीन्स् देण्याची कार्यवाही केली तर मोठा कचरा साचला जाणार नाही. कमी किंमतीच्या या मशीन्स आहे. मा.आयुक्तांच्या अधिकारात ६७-३ सी मध्ये किंवा स्थायी समितीने तातडीने निर्णय घेण्यास हरकत नाही. काही ठिकाणी कचऱ्याचे सेग्रीकेशन सुरू केले. जेथे नाही अशा ठिकाणी जे लोक रस्त्यावर कचरा टाकत असतील तर कठोर कार्यवाही करावी. डीपीआर जो दुरूस्ती करून शासनास द्यायचा आहे. त्याचे सर्व अधिकार मा.महापौर, मा.आयुक्त यांना सभागृह देते. तशी दुरूस्ती करून शासनाकडे तातडीने पाठवावा. स्मार्ट सिटीच्या माध्यमातून मशीनरी तातडीने घेऊन झोन वाईज कार्यवाही करावी.

श्री.गजानन बारवाल :यासाठी शासनाचेही सहकार्य मिळाले. सर्वानी प्रयत्न केले. जी प्रशासकीय कार्यवाही करीत आहोत त्याची माहिती जनतेपर्यंत जाणे आवश्यक होती. जी भुमिका मांडली त्या संदर्भात ज्या मशीनरी खरेदी करावयाच्या असेल ते स्थायी समितीकडे पाठविले तर तात्काळ मंजुरी दिली किंवा कार्योत्तर मंजूरी दिली जाईल.

श्री.राजू शिंदे :जेथे कचरा टाकण्यास गेलो. विरोधच होत गेला. कारण नारेगाव येथे जो कचरा टाकला जातो तेथील परिस्थित आपल्या गावची होऊ नये असे वाटल्याने विरोध झाला. एवढे दिवसात मनपाने काहीच केले नाही. सत्यम प्रोजेक्ट असेल, इतर ही प्रोजेक्ट राबविण्याचा प्रयत्न केला. यश आले नाही. डम्पींग करण्याची आता पध्दत नाही. गेल्या तीन महिन्यात मशीनरी लावून कचरा प्रोसेसींग करण्यास सुरूवात झाली असती तर इतका विरोध झाला नसता. नवीन काही तरी मनपा करीत आहे. असा समज लोकांचा झाला असता. परंतु त्यात यश आले नाही. येथील लोकांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी ग्रामीण भागात कचरा नेऊन टाकणे हे कितपत योग्य आहे. या बाबत जे काही निर्णय घ्यायचा आहे त्यांचे अधिकार मा.महापौर, उपमहापौर, मा.आयुक्त यांना सभागृह देत आहे. डि-सेन्ट्रलाईज केले पाहिजे. प्रत्येक वार्डात जागेवरच मशीन लावून कचरा जिरवला पाहिजे. प्रक्रिया खत केले पाहिजे. खत तयार करून उत्पन्न होऊ शकेल. ३०-४० वार्डात जागा आहे तेथे सुरू केले तर बरेच काम हलके होईल.

झोन-वाईज मशीन्स बसवावे. वेगवेगळे प्रयोग करून खत निर्मिती बायोगॅस निर्माण होईल. कचरा संदर्भात आणीबाणीची परीस्थिती निर्माण झाली. यासाठी मा.आयुक्तानी त्यांचे अधिकारात कार्यवाही करावी किंवा अल्प मुदतीची निविदा काढून कार्यवाही करावी. या प्रोसेससाठी प्रत्येक विभागाचे अधिकारी कामाला लावावेत. शासनाचा निधी घेण्याचा प्रयत्न करावा. जे जे सदस्य मागणी करतील त्यांचे वार्डात लहान मशीन्स् देऊन कचरा प्रोसेसीग करावे. ओला सुका कचरा वेगळा करण्यासाठी एक संधी निर्माण झाली. तो वेगवेगळा व्हावा. तरच प्रोजेक्ट सक्सेस होईल. इतर शहरात ओला- सुका कचरा वेगळा होतो म्हणून प्रोजेक्ट चालू आहे. नागरीकांनी सुध्दा घरातून निघणारा कचरा हा वेगवेगळा करून देणेसाठी प्रयत्न करावे.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:कचरा संदर्भात स.सदस्य परीस्थिती हाताळण्याचा प्रयत्न करीत आहे. ७० टक्के लोक सेग्रीकेशन करतात. २० टक्के लोकांची मानसिकता नाही. जे जे नागरीक सोसायटी असेल इतर प्लॅट सिस्टम असेल अशा भागात करामध्ये सवलत दिली पाहिजे. स्मार्ट सिटीतून वार्डात मशीन्स् द्याव्यात. लगेच कामाला सुरूवात होईल. तसेच प्लास्टीक बंदीची मोहिम राबवावी. ओला सुका कचरा वेगळा करून नागरीक देत नसेल त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्रीमती किर्ती शिंदे :शासनाने यासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. राज्य व केंद्र शासनाच्या निधीतून हे काम करायचे आहे. अनेक प्रस्ताव समोर आहे. योग्य प्रोजेक्ट निवडावा. नागरीकांच्या हिताचा असावा. हा प्रकल्प यशस्वी व्हावा. खाजगी एजन्सीला दिला तर योग्यच आहे. कार्यशाळा घेण्यात यावी. वेबसाईटवर माहिती द्यावी. खत निर्माण होणारे शेतकऱ्यांना द्यावे.

श्री.प्रमोद राठोड :माझी सिटी टकाटक यासाठी सीआरटी या संस्थेने मनपास मदत केली आहे. जो सुधारीत डीपीआर पाठविणार आहे. या संस्थेने केलेल्या कामाचा अनुभव आहे. तो सुध्दा त्यात नमूद करावा.

श्री.नासेर सिद्दीकी :२०-२२ दिवसापासून कचऱ्याची गंभीर परीस्थिती आहे. काही ठिकाणचा कचरा उचलला गेला. परंतु जुन्या शहरात कचऱ्याचे ढिगारे आहे. प्रभाग क्रमांक-३ मध्ये ७ एकर जागा आहे. तेथे पुर्ण जागेत कचरा टाकला आहे. आणखी किती दिवस तेथेच कचरा टाकणार आहे? पुढील नियोजन काय आहे. मशीन्स् खरेदी करत आहोत. परंतु जुन्या शहरामधील कचरा केंव्हा उचलणार आहे? नसता नागरीक आंदोलन करतील. मशीन घेतल्यानंतर कुठे लावणार आहे? राज्य शासनाच्या मान्यतेने एमआयडीसी भागातील जागा घ्यावी. प्लॅट उभारणी करावी.

श्री.राजू शिंदे :प्रत्येक वार्डातील आपआपली जबाबदारी समजून काम करावे. मशीन्स कुठे बसविणार ते ठरवावे. नागरीकांना कन्व्हेन्स करावे. आता नारेगावचा बंद करणार एमआयडीसीमध्ये करणार असेल तर योग्य नाही.

श्री.रावसाहेब आमले :मिटमिटा गट नं ५४ मध्ये कचरा टाकणार. असे कळाले. कचरा डम्पींग करीत असेल तर योग्य नाही. प्रक्रीया करीत असेल तर काही अंतरावरच ऐतिहासिक किल्ला आहे. अशा स्थळाच्या ठिकाणी मा.विभागीय आयुक्त मा.जिल्हाधिकारी परवानगी देत नाही. तर तेथे कचरा टाकण्याचे नियोजन कसे केले. नक्षत्रवाडी,

मिटमिटा भागात दादागिरी करून नागरीकांचा विरोध दर्शवून कचरा टाकला गेला. तेथील जनतेला विश्वासात घ्यावे. त्यानंतर कार्यवाही व्हावी.

श्री.राजगौरव वानखेडे :सर्व स.पदाधिकारी सदस्य, प्रशासन यासाठी प्रयत्न करीत आहे. आताच प्रशासनाने माहिती दिली. जो कचरा पडलेला आहे त्याचे २-३ दिवसात नियोजन करावे. सर्वांनी एकत्र येऊन ही समस्या सोडवायची आहे. १०-१५ वार्डात जेथे जागा आहे. तेथे ओला कचरा टाकतो व सुका कचरा सेन्ट्रल नाका येथे टाकत आहे. हडको, सिडको भागात कचरा दिसून येत नाही. जुन्या वार्डात कचरा विघटन कसा होईल. प्रयत्न करावे. सर्व सदस्यांनीही याकडे लक्ष देऊन प्रशासनाला मदत करावी.

मा.आयुक्त :शहरात पडलेल्या कचऱ्याची विल्हेवाट दोन दिवसात शास्त्रोक्त पध्दतीने केली जाईल. शासनाने मा.विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली सह नियंत्रण समिती नेमली. यावर ते लक्ष ठेवून आहे.

श्रीमती संगिता वाघुले :माझे वार्डात कुठेच ओपनस्पेस नाही तर मशीन्स् कुठे बसविणार आहे?

श्रीमती सुनिता आऊलवार :ओला-सुका कचरा वेगळा व्हावा. जेणे करून खत निर्मिती करता येते. प्रतापनगर भागात अशी प्रक्रिया होते. प्रत्येक वार्डात असे नियोजन करावे. घंटा गाड्या तसेच डस्टबीन्स् देण्यात यावे. प्रत्येक वार्डासाठी प्रोसेसींग मशीन्स द्याव्यात. सर्वानी मिळून योग्य निर्णय घ्यावा.

श्रीमती माधुरी देशमुख :कॅरीबॅग बंद करणेसाठी काय कार्यवाही केली? मार्केट मध्ये अनेक दुकानामधून कॅरीबॅग मधून वस्तू दिल्या जातात. जेथे कॅरीबॅग निर्मिती होते. त्यांचेवर कार्यवाही व्हावी. सील लावावे. सेन्ट्रल नाका येथे मोठा कचरा डम्प केला. दुर्गंधी सुटली आहे. स्प्रे होत नाही. कर्मचारी यांना काम करणे कठीण झाले. १९ दिवसात कचरा प्रोसेसींगची कार्यवाही का झाली नाही? मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या देवगिरी कॉलेज मध्ये मशीन्स् उपलब्ध आहे. आता डेमो पाहू शकतो. कमी किंमतीत मिळू शकेल.

मा.महापौर :प्लास्टीक बंदी बाबत पेपरला आवाहन केले व कार्यवाही करण्याचे आदेशीत केले आहे. कचरा मुक्ती होण्यासाठी सर्व काम करीत आहे. जकात नाका येथे साचविलेला कचरा वर स्प्रे, पावडर मारतो. माशा तेथे नाही. ऑनव्हील प्रोसेससाठी कार्यवाही होणार आहे.

कु.यशश्री बाखरीया :प्रत्येक वार्डातील कचरा त्या-त्या वार्डात प्रोसेसींग करण्याचा प्रयत्न करावा. मोतीकारंजा नाल्याच्या बाजूला ९० गुंठे जागेवर अतिक्रमण केले. ते हटविले तर ती जागा कचरा प्रोसेसींगचा प्लँट बसविण्यास मदत होईल.

श्रीमती सायरा बानो :जे लोक कचरा रस्त्यावर फेकतात. त्यांना दंड आकारावा. माझे वार्डात अनेक भागातील कचरा आणून टाकत आहे. छोटी मशीन लावून त्या त्या वार्डातील कचरा प्रोसेसींग करावे. जून्या शहरातील कचरा प्रोसेसींग करून विल्हेवाट लावावी.

कु.सायली जमादार :डि-सेन्ट्रलाईज पध्दतीने कचरा विल्हेवाट लावावी. एकाच ठिकाणी कचरा डम्प होऊ नये प्रत्येक झोन-वाईज मशीन लावून कार्यवाही करावी. नागरीक ओला सुका-कचरा वेगळा करतात. परंतु गाडीमध्ये दिल्यानंतर तो एकत्र होतो. त्यासाठी यंत्रणा मजबूत करावी. सातारा-देवळाईसाठी कचरा गाड्या व

कर्मचारी द्यावे. मॅकेनिकल कम्पोस्टीग करावे. भविष्याचा विचार करून कार्यवाही व्हावी.

श्रीमती मिना गायके :माझे वार्डात शिवाजी महाराज पुतळ्याजवळ कचरा आणून टाकत आहे. तो उचलावा. तेथे कुणी कचरा टाकणार नाही. यासाठी दोन कर्मचारी द्यावे.

श्रीमती समीना शेख :शहरात ३० टक्के वार्ड स्लम आहे. तेथे ओपनस्पेस नाही. झोन-वाईज कचरा प्रोसेसींग करावी. माझे वार्डात ओला व सुका-कचरा वेगळा होतो. कॅरीबॅग बंद कराव्यात. शहराच्या आसपास मोठ्या खदानी आहेत. तेथे कचरा डम्प करू शकतो. शासनाची मान्यता घेऊन कार्यवाही करावी.

श्री.अब्दुल नाईकवाडी :नारेगांवचे आंदोलन तीन महिन्यापूर्वी झाले. तेंव्हापासून कचरा प्रोसेसींग करण्याची कार्यवाही का केली नाही? जुन्या शहरात मोठा कचरा साचला तो उचलावा. सिडकोने सन-२००६ ला महापालिकेला २०० कोटीच्या जागा दिल्या. त्यातून श्री.अग्रवाल यांना जागा देऊन प्रोसेसींग प्लॅन्ट का करीत नाही. सिडको भागात अनेक महत्वाच्या मोक्याच्या जागा आहेत. त्या रिकाम्या करून घ्याव्यात. तेथे कचरा प्रोसेसींग करावे.

श्री.अजीम अहेमद :जुन्या शहरात अनेक वार्डात ओपनस्पेस नाही. झोन-वाईज मशीन्स् बसवून कचरा प्रोसेसींग करावे. रोषणगेट वार्डात ११ दिवसापासून कचरा उचलला नाही. गाडी देत नव्हते मी स्वतः गेलो. तेंव्हा गाडी दिली. औषध फवारणी होत नाही.

मा.महापौर :झोन अधिकारी यांनी ताबडतोब त्या ठिकाणी जाऊन औषध फवारणी करावी.

श्री.अय्युब जहागीदार :नारेगाव येथे कचरा नेऊन टाकत होतो. कचरा डम्प करणे. हे राज्य शासनाच्या निर्णयानुसार व नियमानुसार योग्य नाही. सन-२००३ मध्ये मा.न्यायालयाने तेथे कचरा टाकण्यास मनाई केली असतांना तेथे कचरा टाकला जात होता. एअर पोर्ट मंडळाच्या नियमानुसार १० कि.मी.च्या आत कचरा टाकणे योग्य नाही. डम्प केलेला कचरा दोन दिवसात उचलणार असे म्हटले. साचलेला कचरा उचलला नाही तर १५ लक्ष नागरीकांचे आरोग्य धोक्यात येईल. मनपाच्या जागेवर नागरीक कचरा टाकू देत नाही. जे की, नारेगाव सारखी परीस्थिती होईल. असे त्यांना वाटते आहे. जे विरोध करीत आहे. त्यांचेवर कार्यवाही करावी. शहराच्या चार भागात चार मशीन्स् बसविण्यात यावे.

श्री.जमीर कादरी :प्रत्येक वार्डात डस्टबीन्स् देण्यात यावे. ओला-सुका कचरा वेगळा होईल. कचरा उचलण्या बरोबरच साफसफाई होणे बंद केले. शहराच्या बाजूला खदानी आहे. तेथे डम्प करावा. शासन निधी देणेस तयार आहे. आज ठोस निर्णय घ्यावा.

श्रीमती समीना शेख :हॉस्पीटल, हॉटेल, शादीखाना, मंगल कार्यालय यांचा जास्तीचा कचरा साचतो. त्यांचेच जागेवर त्यांनी कचरा डम्प करून प्रोसेसींग केले पाहिजे. अशी सक्ती करावी. कचरा प्रोसेसींग युनीट व इतर कचऱ्याचे कामासाठी स्वतंत्र कर्मचारी असावे.

श्री.अब्दुल ताहेर शेख :पब्लीक ॲक्टीव्हीटीज जागेवर कचरा डम्प, प्रोसेसींग करू नये.

मा.महापौर :सभा अर्धा तासाठी तहकूब करण्यात येते. (वेळ दु.२.०० वा.पुन्हा सभा दु.२.४० वा.सुरूवात.)

श्रीमती ज्योती पिंजरकर:वार्डात मनपाची शाळा असून तेथे तीन विद्यार्थी आहेत. ४ एकर जागा आहे तेथे कचऱ्यासाठी त्या जागेची मदत होईल.

कु.सायली जमादार :सातारा देवळाई भागात कर्मचारी, कचरा वाहने द्यावी. कचरा उचलला जाईल.

श्री.सिध्दांत सिरसाट :शहराच्या बाहेरील नागरीकांना विश्वासात घेऊन कचरा टाकावा. रात्री कचरा घेऊन जातो. हे योग्य नाही. कचरा जाळला जाऊ नये. दादागिरी करून कचरा टाकतो. हे योग्य नाही. किती दिवस कचरा टाकणार आहे? व त्यानंतर प्रोसेसींग करणार नागरीकांना लेखी द्यावे सम्मती देतील.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार कचऱ्याची विल्हेवाट लावणेकरीता वरील प्रमाणे स.सदस्यांनी केलेल्या सुचनेनुसार व मा.महापौर यांनी दिलेले निर्देश निर्णय विचारात घेऊन कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३६१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, खगा एनर्जी प्रा.लि.पुणे (Khaga Energy pvt.ltd.Pune) यांनी दिनांक ०५.०३.२०१८ रोजी आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना कचऱ्यापासून वीज निर्मीती करण्याचा प्रकल्प उभारण्याबाबत सादरीकरण केले आहे. सदरची कंपनी ही मे.Chosun Refractories Eng.Co.Ltd. Korea, यांची टेक्नॉलॉजी प्रोव्हायडर कंपनी आहे.

सदर कंपनीने औरंगाबाद शहरासाठी ५०० मेट्रिक टन कचऱ्यापासुन वीज निर्मीती करण्यासाठी स्वखर्चाने प्रकल्प उभारणार असल्याचे सांगितले आहे. यासाठी या कंपनीस २५ वर्षासाठी ५ एकर जागा लिजवर द्यावी लागेल व अंदाजे १.५ MLD पाणी आवश्यक असून ते औरंगाबाद महानगरपालिकेने विनामुल्य द्यावयाचे आहे. औरंगाबाद महानगरपालिकेचे कांचनवाडी, पडेगाव व झाल्टा येथे STP Plants आहेत. त्यातुन निघालेले पाणी त्यांना देता येऊ शकेल. तसेच प्रकल्पासाठी लागणारा घनकचरा हा प्रकल्पापर्यंत वाहतूक करण्याची जबाबदारी औरंगाबाद महानगरपालिकेची असेल. सदर प्रकल्प उभारणीसाठी लागणारा कालावधी हा १८ महिन्यांचा आहे.

मुख्य म्हणजे या कंपनीस प्रकल्प उभारण्यासाठी काहीही रक्कम देण्याची आवश्यकता नाही. उलटपक्षी कंपनीने तयार होणारी वीज विकल्यानंतर त्यातून येणाऱ्या रक्कमेमधून ५% रक्कम महानगरपालिकेस मिळणार आहे.

नारेगाव कचरा डेपो येथे शहरातील दैनंदिन जमा होत असलेला कचरा टाकण्यास आसपासच्या नागरीकांनी तीर्व विरोध केला असल्याने औरंगाबाद शहरातील घनकचऱ्याची दि.१६.०२.२०१८ पासून वाहतूक समस्या/आणीबाणी निर्माण झाली असून तातडीने उपाय योजना करणे अपरिहार्य आहे.

प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**निर्णय:-**

मा.महापौर :प्रस्ताव दुरुस्तीसह मंजुर. प्रशासनाच्या वतीने सभागृहासमोर प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये ५०० मॅट्रीक टन कचऱ्यापासून वीज निर्मिती करण्यासाठी स्वखर्चाने प्रकल्प उभारण्याची तयारी दर्शविली असल्याने मे.Chosun Refractories Eng.Co.Ltd. Korea, ही कंपनी आहे. हा प्रस्ताव दिलेला आहे. हा मंजूर करीत असतांना शासनाच्या गाइड लाईन्स नुसार मार्गदर्शनासाठी पाठवून शासनाच्या मान्यतेस अधिन राहून मंजूर करण्यात येतो. शासनाचे मार्गदर्शन काय येते परत आवश्यकता वाटल्यास पुन्हा सभागृहासमोर ठेवता येईल.

कचराकोंडीमुळे आणीबाणीची परीस्थिती निर्माण झाली. दि.१६.०२.२०१८ पासून नारेगाव कचरा डेपो येथे कचरा टाकण्यास प्रतिबंध झाल्यामुळे आणि गेल्या २० दिवसांमध्ये पर्यायी जागांचा कचरा टाकण्यासाठी शोध घेण्यात आला असता, त्याला देखील स्थानिकांकडून प्रचंड विरोध झालेला आहे. त्यामुळे महापालिका क्षेत्रात दररोज निर्माण होणारा कचरा जमा करणे व त्यावर प्रक्रिया करणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा शहरामध्ये गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते. यासाठी स.पदाधिकारी व सर्व स.नगरसेवक आणि शहरातील तमाम सहकार्याची आवश्यकता आहे.

कचरा शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे व त्यावर प्रक्रिया करणे आणि ज्याठिकाणी हे काम केले जाणार आहे तेथे टाकलेल्या कच-याची दुर्गंधी येऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. तसे आदेश प्रशासनाला देण्यात येते. नागरिकांना विश्वासात घेऊन त्यांच्या सहकार्याने हे काम करावे लागणार आहे. नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. प्रशासनातर्फे स. सदस्यांना सोबत घेऊन वॉर्डातील नागरिकांना कचरा वर्गीकरण करणे व या परिस्थितीतून बाहेर येण्यासाठी सहकार्य करण्यासाठी आवाहन करावे.

आजच्या सभेत स. सदस्यांनी उपयुक्त सूचना मांडल्या, त्यात प्लॅस्टिक कॅरीबॅग वापरण्यावर संपूर्णपणे बंदी घालणे, नागरिकांच्या हिताचा प्रक्रिया प्रकल्प उभारणे, ३० वर्षे हा प्रकल्प शहरात राहणार आहे.कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी लागणारे यंत्र खरेदी करण्यासाठी मा.आयुक्तांनी त्यांच्या विशेष अधिकाराचा वापर करावा व यंत्र खरेदी करावेत. नसता तीन दिवसांची अल्प/शॉर्ट टेंडर नोटीस काढून खुल्या बाजारातून निविदा मागवून रु.१० कोटी स्मार्ट सिटी योजनेतून यंत्र खरेदी करण्यात यावे. तसेच स्मार्ट सिटीच्या मंजूर निधीतून १०,००० डस्टबिन्स् तात्काळ खरेदी करण्याबाबतही कार्यवाही करावी. व 25 E रिक्षा सुध्दा खरेदी कराव्यात. नागरिकांच्या जनजागृतीसाठी कार्यशाळा घेणे, नागरीकांना डस्टबीन्स वितरीत करणे. डीपीआर मध्ये दर्शविल्यानुसार ७५% केंद्रीभुत व २५**%** विकेंद्रीकरणाद्वारे असे विभागून केले आहे. कचऱ्या संदर्भात स्वतंत्र वेबसाईट तयार करणे. विकेंद्रीकरण करुन कचऱ्यावर प्रक्रिया करणे. आपल्याच भागात हौसिंग सोसायटी किंवा नागरिकांच्या द्वारे कचऱ्याची विल्हेवाट लावणाऱ्याला करामध्ये १% सवलत देणे. मिक्स कचऱ्यामुळे अडचणी निर्माण होतात त्यासाठी ओला, सुका व प्लॅस्टिक कचरा वेगवेगळा असल्याशिवाय स्वीकारु नये यासाठी कठोर पावले उचलावित.

कचऱ्यामधुन वेगळ्या केलेल्या प्लॅस्टिकपासुन डांबर किंवा पेट्रोल निर्मिती करता येते. प्रथमतः नागरिकांच्या जनजागृतीसाठी मोहिम राबवावी आणि त्याची कठोर अंमलबजावणी करण्यासाठी काही कालावधीनंतर दंडात्मक कार्यवाहीचा विचार करावा.

कचराकोंडीतून योग्य मार्ग काढणेसाठी महाराष्ट्र शासनाकडून आपल्याला आवश्यक ती मदत दिली जाणार आहे. आज सन्माननीय सदस्यांनी आपआपल्या भुमिका व उपाययोजना सभागृहात मांडलेल्या आहेत. प्रशासनाने

आपली भुमिका यासंदर्भात सभागृहासमोर मांडलेली आहे. कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी जी मशिनरी उभारावी लागणार आहे. त्यासाठी कार्यवाही करावी. जे नागरीक रस्त्यावर कचरा टाकतील. त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद शहरातील घनकचऱ्याची दि.१६.०२.२०१८ पासून वाहतूक समस्या त्याचबरोबर आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाल्याने तातडीने उपाय योजना करणे अपरिहार्य आहे. यासाठी खगा एनर्जी प्रा.लि.पुणे (Khaga Energy pvt.ltd.Pune) या कंपनीमार्फत औरंगाबाद शहरासाठी ५०० मेट्रिक टन कचऱ्यापासुन वीज निर्मीती करण्यासाठी स्वखर्चाने प्रस्तावात नमुद केलेल्या अटीशर्तीनुसार प्रकल्प उभारण्यास दुरुस्तीसह मान्यता देण्यात येते.

**-:प्रमुख अटी-शर्ती:-**

१. कंपनीस २५ वर्षासाठी ५ एकर जागा लिजवर देण्यास मान्यता देण्यात येते.
२. प्रकल्प कार्यान्वीन झाल्यानंतर कांचनवाडी, पडेगाव व झाल्टा येथील STP मधुन निर्माण होणारे व सदर प्रकल्प चालविण्यासाठी आवश्यक असलेले अंदाजे १.५ MLD पाणी महानगरपालिकेने विनामुल्य देण्यास मान्यता देण्यात येते.
३. प्रकल्पासाठी लागणारा घनकचरा हा प्रकल्पापर्यंत वाहतूक करण्याची जबाबदारी औरंगाबाद महानगरपालिकेची असेल.
४. कंपनीने कार्यादेश दिनांकापासून १२ महिन्यात प्रकल्पाची उभारणी करावी.
५. या प्रकल्पामधुन होणारी वीज विकल्यानंतर त्यातून येणाऱ्या रक्कमेमधून ५% रक्कम रॉयल्टी म्हणुन महापालिकेस मिळेल.

सदर प्रस्तावास शासनाच्या गाइड लाईन्सनुसार मार्गदर्शनासाठी पाठवून शासनाच्या मान्यतेस अधिन राहून सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३६१/१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेने शासनमार्फत दिनांक २४.०१.२०१८ रोजी नियुक्त करण्यात आलेल्या Eco Pro Environmental Services इंदौर या संस्थेस दिनांक ३०.०१.२०१८ रोजी औरंगाबाद घनकचरा व्यवस्थापन विभागाचा सविस्तर अहवाल (DPR) तयार करण्यासाठीचे कार्यादेश देण्यात आले होते. या अनुषंगाने संबंधीत कंपनी दि.१६.०२.२०१८ रोजी DPR तयार करून महानगरपालिकेस सादर केला.

दरम्यानच्या काळात नारेगांव/मांडकी येथील नागरीकांनी विरोध दर्शविल्यामुळे शहरातील कचऱ्याची समस्या वाढली आहे. यामुळे जा.क्र/मनपा/घकव्य/६३/२०१८ दि.१७.०२.२०१८ नुसार मा.प्रधान सचिव (०२) यांना मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता. परंतु सदरील DPR मध्ये तांत्रीक दुरुस्त्या सुचविल्या असल्याने सुधारीत DPR तयार करून दिनांक २७.०२.२०१८ रोजी पुन्हा शासनास मान्यतेसाठी पाठविण्यात आला आहे.

तरी दिनांक ०७.०३.२०१८ च्या विशेष मा.सर्वसाधारण सभेमध्ये घनकचरा व्यवस्थापन विभागाचा सविस्तर अहवाल DPR चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

श्री.विकास जैन :सर्व लोकप्रतिनिधी प्रशासन यांनी जागा मिळविणेसाठी प्रयत्न केले. आंदोलकांना समजावण्याचा प्रयत्न केला. प्रोसेसींग युनीट मशीन्स् नसल्याने नागरीक विरोध करीत आहे. २० दिवसापासून कचरा जिरवण्याचा प्रयत्न करतो आहे. स्मार्ट सिटी मधून मशीन्स् घेणेची मान्यता मिळाली. लवकर कार्यवाही

करावी. डस्टबीन्स् घेण्यात याव्यात. पॅनसिटी साठी रू.२३ कोटी व इतर मिशनसाठी रु.१६ कोटी असे एकूण रु.४० कोटी उपलब्ध आहेत. त्यातून काम करणेस अडचण नाही. २५ ॲटोरिक्षा घ्याव्यात. कालच मा.न्यायालयाने कचऱ्याच्या संदर्भात निर्णय दिला आहे. त्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली पाहिजे. नागरीकांना न्याय मिळाला पाहिजे. शासन सहकार्य करीत आहे. ज्या ठिकाणी कचरा टाकतो तेथे विन्डोज तयार केले जावे. ताबडतोब मशीन्स् लावून प्रोसेसींग करावे. डीपीआर संदर्भात माहिती द्यावी.

मा.महापौर :महत्वाचा विषय यंत्र खरेदी, डि-सेन्ट्रलाईजेशन, स्मार्ट सिटीतून रु.१० कोटी मंजूर झालेले आहे. १० हजार डस्टबीन खरेदी करणे, हे महत्वाचे विषय आहे. इका-प्रो-इनव्हॉलमेन्टल सर्वीसेस इंदौर या संस्थेला डीपीआरचे काम देण्यात आले होते. त्याचे प्रतिनिधी येथे उपस्थित असून डीपीआर संदर्भात पावर पॉईन्ट प्रेजेन्टेशननुसार माहिती देणार आहे.

या वेळी डीपीआर संदर्भात पावर पॉईन्ट प्रेजेन्टेशननुसार माहिती देण्यात आली.

श्री.विकास जैन :दुरूस्तीसह डीपीआरला मंजूरी द्यावी. मनपाचा जो हिस्सा खर्च करायचा आहे. तो स्मार्ट सिटीतून खर्च करावा. इतर विकास कामावर यामूळे फरक पडणार नाही.

श्री.नासेर सिध्दीकी :हर्सुल येथील जागेचा उल्लेख यात आहे तेथे नेमके काय करणार आहे?

अभियंता (एजन्सी) :त्या ठिकाणी ट्रान्सफर, डि-सेन्ट्रलाईज पॉईन्ट आहे.

मा.महापौर :जांभूळवन जेथे नागरीकांचे पुर्नवसन केले. तेथे मनपाची जागा आहे तेथे अतिक्रमण झालेले आहे. ते काढावे लागेल.

श्री.राजगौरव वानखेडे :डीपीआर मंजूर झाल्यानंतर जागा घेण्यास टेक्नीकल अडचण येऊ नये. जेथे जागा आहे. तेथे करावा. जागेचा उल्लेख आहे तो वगळावा दुरूस्तीसह मंजूर करावे.

मा.महापौर :प्रशासनाने कचरा प्रक्रिया करणेसाठी महानगरपालिकेने शासनामार्फत नियुक्त केलेल्या एजन्सीकडून जो डीपीआर तयार करण्यात आला होता. त्याची संक्षिप्त टिप्पणी या सभागृहात सादर करण्यात आली होती. यावर चर्चा झाली. मा.प्रधान सचिव यांचेकडे दिनांक १७ फेब्रुवारी २०१८ रोजी डीपीआर पाठविण्यात आला होता. परंतु त्यात शासनाच्या बऱ्याच तांत्रिक दुरूस्त्या आहेत. त्या करून दिनांक २७ फेब्रुवारी २०१८ रोजी महापालिकेकडे परत पाठविला व तो सभागृहात ठेवण्यात आला. त्यात राज्य शासन, केंद्र शासन व महापालिकेचा हिस्सा नमूद आहेत. सभागृहाने महापौरांना या डीपीआरच्या बाबतीत ज्या काही दुरूस्त्या करावयाच्या आहेत. त्याचे अधिकार दिले आहेत. हा ठराव मंजूर करीत असतांना रु.३० कोटी ५४ लक्ष ३९ हजार ९४१ इतका मनपाचा हिस्सा लागणार आहे. तो काही कमी करता येऊ शकतो का? तसेच स्मार्ट सिटी असेल व इतर योजना असेल त्या योजनेमधून हा हिस्सा देता येऊ शकतो का? त्या बाबतीतही प्रशासनाने प्रयत्न करावेत. पीएमसी सुध्दा त्या माध्यमातून वेगवेगळे पर्याय सुचवतील. जागेच्या उपलब्धतेनुसार त्या ठिकाणी ७५ टक्के सेन्ट्रलाईजेशन व २५ टक्के डी-सेन्ट्रलाईजेशन नुसार कार्यवाही करण्यात यावी. या डीपीआरच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रशासनाने कचरा प्रक्रिया करणेसाठी महानगरपालिकेने शासनामार्फत नियुक्त केलेल्या एजन्सीकडून डीपीआर तयार करण्यात आला आहे. त्याची संक्षिप्त टिप्पणी या सभागृहात प्रशासनातर्फे सादर केलेली असून मा.प्रधान सचिव यांचेकडे दिनांक १७ फेब्रुवारी २०१८ रोजी डीपीआर सादर करण्यात आला होता. परंतु त्यात शासनाने बऱ्याच दुरूस्त्या सुचविल्या आहेत असे कळते. त्या दुरुस्त्या करून दिनांक २७ फेब्रुवारी २०१८ रोजी महापालिकेकडे परत पाठविला. सदर डी.पी.आर. नुसार प्रकल्पाची किंमत रु.८८,८५,४०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये अठ्ठयांशी कोटी पंच्याऐंशी लाख चाळीस हजार फक्त) आहे. यात राज्य शासन, केंद्र शासन व महापालिकेचा हिस्सा नमूद असून सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महापौरांना या डीपीआरच्या बाबतीत ज्या काही दुरूस्त्या करावयाच्या आहेत त्याचे अधिकार दिले असून यात मनपाचा हिस्सा टाकावा लागणार असल्याने तो माननीय शासनास विनंती करून शासनाकडून अनुदान प्राप्त करुन महानगरपालिकेचा हिस्सा भरावा या बाबतीत प्रशासनाने कार्यवाही करावी. शासनाने दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे कालबध्द कार्यक्रम निश्चित करून डि.पी.आर.ची तंतोतंत अंमलबजावणी करावी. जागेच्या उपलब्धतेनुसार प्रशासनाने निश्चित केलेल्या ठिकाणी ७५ टक्के सेन्ट्रलाईजेशन व २५ टक्के डी-सेन्ट्रलाईजेशन नुसार कार्यवाही करावी. सदर रक्कम रु.८८,८५,४०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये अठ्ठयाऐंशी कोटी पंच्याऐंशी लाख चाळीस हजार फक्त) च्या सविस्तर प्रकल्प आराखड्यास (DPR) मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी जाहीर केले.

दिलीप दत्तात्रय सुर्यवंशी
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद